मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शहरात होणार ३० ठिकाणी नाकाबंदी!

## वाहनचालकाची कसून चौकशी करण्यात येणार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
नववर्षाच्या स्वागतार्थ बरेच नागरिक घराबाहेर पडून मध्यरात्री पर्यंत पार्ट्यांचे आयोजन करत असतात. बऱ्याचदा नागरिक नशा करुन वाहन चालवून हुल्लडबाजी करतात. अशांवर पिंपरी-चिंचवड पोलीस करडी नजर ठेवून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरात ३० ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे.



नाकाबंदीच्या ठिकाणी प्रत्येक वाहनचालकाची कसून चौकशी करण्यात येणार असून ब्रेथ ॲनालायझर मशीनच्या सहाय्याने श्वासाचे नमुने तपासण्यात येणार आहेत. दारु पिवून वाहन चालवणाऱ्या प्रत्येक वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात येणार असून त्यांचे वाहन अटकावून ठेवण्यात येणार आहे. कोणीही नशा करुन अथवा धोकादायकरीत्या वाहन चालवू नये. तसेच नववर्षाचे स्वागत उत्साहाने परंतु शांतपणाने, कायद्याचे पालन करुनच करावे व शांतता राखण्याच्या दृष्टीने आपले योगदान द्यावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड पोलीसांच्या वतीने करण्यात आले आहे.


# चिखलीत पुन्हा बिबट्याचा शोध!

**चिखली**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
चिखली परिसरात गेल्या दोन दिवसांपासून आणखी एक बिबट्या वावरत असून तो दिसल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. त्यामुळे, वन विभाग आणि टीम रेस्क्यूच्या पथकाने शनिवारी थर्मल ड्रोन आणि कॅमेऱ्याच्या साहाय्याने संपूर्ण परिसराची पाहणी केली. मात्र, यामध्ये बिबट्याच्या अस्तित्वाच्या खाणा-खुणा आढळून आल्या नाहीत.
चिखलीमध्ये अवघ्या दोन दिवसांपूर्वी सलग चार तासांच्या अथक प्रयत्नांतर वन खाते, टीम रेस्क्यूला ३ वर्षांच्या नर बिबट्याला पकडण्यात यश आले होते. त्यानंतर, चिखली परिसरात पुन्हा एकदा नव्याने आणखी एका बिबट्याचा वावर असल्याची चर्चा सुरु झाली आहे. स्थानिक रहिवासी सागर उपासे यांनी चिखलीतील गायरानात शुक्रवारी बिबट्या दिसल्याचे सांगितले. त्यानंतर, अभिषेक भांगरे या तरुणाने शेतात ट्रॅक्टरने नांगरणी करत असताना शनिवारी सकाळी बिबट्या दिसल्याचा दावा केला. त्याच्या मागे, कुत्री भुंकत पळत असतानाचा व्हिडिओ त्याने आपल्या मोबाईलमध्ये काढला. चिखलीतील नागरिकांनी लगेचच वन विभाग, टीम रेस्क्यू आणि पोलिस प्रशासनाशी संपर्क साधला. वन विभाग, टीम रेस्क्यूने थर्मल ड्रोन आणि कॅमेऱ्याच्या साहाय्याने संपूर्ण परिसराची पाहणी केली.

# मूळव्याधीने तरूण त्रस्त; ओबड-धोबड जीवनशैलीचा परिणाम

## वर्क फ्रॉम होम करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक

**मनीषा थोरात- पिसाळ**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
ओबड-धोबड जीवनशैली व्यायामाचा अभाव ताणतणाव फायबरविरहित आहार या सर्वांचा परिणाम ३० ते ४० वयोगटातील तरूणांवर होतो आहे. सध्या एक चतुर्थांश रूग्ण हे मुळव्याधीने त्रस्त असून, वर्कफॉर्म होम असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः ७५ टक्के मुळव्याधीचे रूग्ण हे पुरुषच असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली. सलग तीन-चार तास एका जागेवर बसून काम करणाऱ्यांना तसेच थॉयराईडचा त्रास असलेल्यांनाही हळूहळू मुळव्याधीचा त्रास सुरु होतो. या आजाराचे प्रमाण हे लॉकडाऊनपासून सर्वाधिक प्रमाणात वाढले असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली. लॉकडाऊनमध्ये बहुतांश कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी घरातून काम केले. अजूनही अनेकांचे वर्कफॉर्म होम सुरु आहे. ऑफिस आणि घरातून काम करण्यातील फरक या निमित्ताने स्पष्ट जाणवला, असे सॉफ्टवेअर इंजिनियर प्रदीप थोरात म्हणाले. घरात एकाच जागी दोन ते तीन



**हे तीन 'सी' आहरा घ्या**
» गाईचं तूप (काऊज् घी), दही (कड) आणि लिंबूवर्गीय फळे (सिक्रस फूड)
**हे तीन 'पी' टाळा**
फ्रिझव्हे, पॅकेज आणि प्रोसेस फूड टाळा

तास सलग बसून काम होतं. ऑफिसमध्ये काम करत असताना वेगवेगळ्या कारणांनी काही शरीराची हालचाल होत असते. पण, घरातून काम करताना फारशी हालचाल होत नाही, असेही त्यांनी सांगितले.

**मूळव्याधीची कारणे**
» मसालेदार पदार्थ » बैठी जीवनशैली » फास्ट फूड » व्यायामाचा अभाव » लॉकडाऊनचा आरोग्यावर झालेला परिणाम » व्यायाम थांबला » खाणं वाढलं » वैद्यकीय सल्ला वेळेत मिळण्यातील अडथळा » रुग्णालये सुरू असूनही कोरोनाच्या भीतीमुळे रुग्ण घराबाहेर पडत नव्हते. वैद्यकीय सल्ला

“ मुळव्याध, फिशर, बद्धकोष्ठता, भगंदर असे गुदद्वाराचे आजाराचा थेट संबंध हा जिवशैलीशी आहे. सॉफ्टवेअर इंजिनियर, बँकेत काम करणारे कर्मचारी, शिक्षक तसेच बैठे काम करणाऱ्यांमध्ये हा आजार दिसतो. यासोबतच सध्या तरुणांमध्ये प्रमाण अधिक वाढले आहे. ओबडधोबड जीवनशैलीचा परिणाम होतो आहे.
–सर्जन डॉ.कांचन इंगळे–वायकुळे

त्यामुळे मुळव्याधींसह विविध छोटे-मोठे आजार आमच्या क्षेत्रातील तरूणांना होत आहेत.

# मालमत्ता धारकांच्या शंकाचे निरसन

## मालमत्ता हस्तांतरण कसे करायचे?


**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** ऑनलाईन मालमत्ता हस्तांतरण कसे करायचे, घर महिलेच्या नावे असेल तर कर आकारणीमध्ये किती सूट मिळते, त्यासाठी काय कागदपत्रे लागतात या सारख्या अशा विविध शंकाचे निरसन करसंवादमध्ये कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्यासह त्यांच्या विभागातील अधिका-यांनी 'ऑन दी स्पॉट' आज (शनिवारी) केले. तसेच मालमत्ता सर्वेक्षणासाठी सहकार्य करावे असे आवाहनही करण्यात आले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जनसंवाद सभेच्या धर्तीवर करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्या संकल्पनेतून ऑनलाईन आणि ऑफलाईन कर संवाद घेण्यात येत आहे. यामध्ये शहरातील नागरिक घर बसल्या आपले प्रश्न मांडून सोडून घेत असल्यामुळे कर संवादला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या संवादमध्ये शहरात सध्या सुरू असलेल्या मालमत्ता सर्वेक्षणासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. हे सर्वेक्षण मालमत्ता धारकांच्या कसे फायद्याचे आहे, याचे महत्व पटवून देण्यात आले. त्यानुसार सर्वेक्षणामध्ये आकारणी न झालेल्या मालमत्ता कर कक्षेत आणून सर्व मालमत्तांना सुलभ क्रमांक देऊन मालमत्तेची माहिती अद्ययावत करण्यात येणार आहे. मालमत्ता सर्वेक्षणात युपीक आयडी (णझखउ) दिल्यामुळे भविष्यात महापालिकेच्या सर्व सेवा, शासनाचे इतर विभाग यांच्यात समन्वय राहण्यासाठी उपयुक्त होणार आहे. नागरिकांना 'डिजी लॉकर'च्या धर्तीवर मालमत्ते संदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे 'प्रॉपर्टी लॉकर'च्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्याची सुविधा, मालमत्ते ची अचूक (झउचउ) मोजणी करून माहिती व पत्ता अद्ययावत करणे, मालमत्तेची विश्वासर्हता वाढून खरेदी, विक्री व्यवहार सुलभ होण्यास मदत, मालमत्ता कर आकारणीबाबत संपूर्ण माहितीचे संकलन करून मालमत्ते अंतर्गत असणाऱ्या रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर पॉवर, घनकचरा विलगीकरण आदी सुविधांबाबत प्रत्यक्ष सर्वेक्षण करून जागेवरच मिळणाऱ्या सवलतीबाबत नोंद करण्यात येणार आहे. हे करत असताना नागरिकांची डिजिटल गोपनीयता जपली जाणार आहे. मालमत्ता धारकांची कागदपत्रे महा पालिकेला सार्वजनिक करण्याचा किंवा न करण्याचा अधिकार नागरिकांकडेच असणार आहे. या संदर्भात सर्व माहिती, प्रश्नांची उत्तरे या करसंवादमध्ये सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्यासह त्यांच्या टीमने दिली. मालमत्ता धारकांचे विविध प्रश्न असतात. मात्र, वेळे अभावी ते कार्यालयात येऊ शकत नाहीत. त्यामुळेच विभागाच्या वतीने ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने महिन्याच्या शेवटच्या शनिवारी करसंवाद घेण्यात येत आहे. घर बसल्या प्रश्न सुटत असल्याने मालमत्ता धारकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून हा एक 'माईलस्टोन संवाद' ठरत असल्याचे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.



# होर्डिंगमुळे अजून किती झाडांवर कुऱ्हाड पडणार

## प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची नागरिकांची मागणी

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** होर्डिंगमुळे सातत्याने झाडांवर रात्रीच्या वेळेस कुऱ्हाड पडते आहे. सातत्याने असे प्रकार घडत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाने कठोर पावले उचलावी अशी मागणीही केली आहे. होर्डिंग दिसत नसल्याने रस्त्याच्या कडेला असलेली तीन झाडे तोडून टाकण्यात आली आहेत. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा सारा प्रकार मोशी येथील सस्तेवाडी येथे घडला आहे. याप्रकरणी साईराज होर्डिंगचे मालक व अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे भानुदास तापकीर यांनी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साईनाथ होर्डिंग यांचे सस्तेवाडी येथे होर्डिंग आहे. या होर्डिंगच्या समोर झाडे येत होती, त्यामुळे (चौहळ) त्यांची जाहिरात दिसत नसल्याने कोणत्याही परवानगी शिवाय त्यांनी एक रेन ट्री, १ पिंपळ, १ पेल्ट फोरम अशी तीन झाडे जमिनीपासून १२ ते १५ फुटापर्यंत तोडून टाकली. यावरून भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.



# मी बाबरी प्रकरणातला आरोपी : राऊत

## मी आतापर्यंत दहा वेळा सीबीआयच्या कोर्टासमोर उभा राहिलोय

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार अमोल कोल्हे यांच्या आक्रोश मोर्चात ठाकरे गटाचे संजय राऊतांनी भाजपवर हल्लाबोल केला. राम मंदिरासाठी मी आतापर्यंत दहा वेळी सीबीआयच्या कोर्टासमोर उभा राहिलोय, तुम्ही काय मला सांगताय, असा थेट वार संजय राऊतांनी भाजपवर केला. यावेळी संजय राऊतांनी खासदार सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे (ओश्र घेश्रहश) यांचा निलंबित असा देखील उल्लेख करत मिश्किल टीप्पणी केली. राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येणार असा विश्वास देखील यावेळी संजय राऊतांनी व्यक्त केलाय. सर्व प्रश्नांना एकच उत्तर श्रीरामाचं दर्शन फ्री, असा खोचक टोला देखील राऊतांनी लगावला आहे. मोदींच्या सगळ्या गॅरंट्यांवर एकच गॅरंटी आहे, ती म्हणजे मोदी वापस नही



आयेगा, असा बोचरा वार संजय राऊतांनी केलाय. आपल्याला त्याची मशीन नाही दुकानचं बंद करायचं आहे, असं राऊतांनी म्हटलं. संजय राऊतांनी यावेळी अजित पवारांची देखील मिमिक्री केली. काहीही झालं तरी अमोल कोल्हेंना पाडणारच असा वक्तव्य अजित पवारांनी केलं होतं. याच वक्तव्याचा उल्लेख संजय राऊतांनी त्यांच्या भाषणादरम्यान केला. यावर त्यांनी म्हटलं की, आमच्या पाडापाडीच्या खेळात पडाल तर पहिलं तुम्ही पडला.नाव घेऊन थेट बोलायचं असतं आणि तो दम आमच्यात आहे. हवा बोहत तेज चल रही है, टोपी उड जायेगी अजितराव, असा टोला देखील राऊतांनी अजित पवारांना लगावला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. त्यामध्ये अगदी काही साध्या मागण्या करण्यात आल्यात. पण या मागण्या घेऊन जर अमोल कोल्हे आणि सुप्रिया सुळे हे अमित शाह किंवा नरेंद्र मोदी यांच्याकडे गेले असते तर त्यांना म्हटलं असतं की, रामलल्ला का दर्शन फ्री मे करावायेंगे. दोन कोटी बेरोजगारांना नोकरी देणार होते, त्यावरपण यांच्याकडे एकच उत्तर की रामलल्ला का दर्शन फ्री करवायेंगे, असं संजय राऊतांनी म्हटलं. बाळासाहेब ठाकरे तेव्हा वाजपेयींना म्हणाले होते की, मोदी गए तो गुजरात गया पण आता मोदी आए तो देश गया अशी स्थिती आहे. इव्हीएम मशीन नसेल तर भाजप ग्रामपंचायत देखील जिंकू शकणार नाही. ही सगळी इव्हीएमची ताकद आहे. कारण त्यांची युती ही फक्त ईव्हीएमसोबत आहे, असा दावा संजय राऊतांनी केलाय. एक काळ होता, आम्ही अभिमाने सांगायचो की हा महाराष्ट्र आधार या भारताचा. आज हा महाराष्ट्र लुटला जातोय. या महाराष्ट्राने देशाचं पोट भरलं अनेक वर्ष. आमचा गुजरातचा विकास होण्यावर आक्षेप नाही, देशाचा विकास व्हायला हवा. तुम्ही आमचे उद्योग न्याल, पण मराठी माणसाचं मनगट आणि धैर्य कसं न्याल. हिमालयाने साद घातली की हा सह्याद्री हा महाराष्ट्र त्याच्या मदतीला धावून जातो. त्या सह्याद्रीशी अशाप्रकारे खेळण्याचा प्रयत्न करु नका, असा इशारा देखील राऊतांनी केला आहे. असं म्हणतात की मोदींनी सगळं विकलं. ओएनजीसी विकलं, हे विकलं पण त्यांनी काही गोष्टी खरेदी देखील केल्या. मोदींनी कोर्ट खरेदी केलं. त्यावर ते आता देश चालवतात, असं म्हणत संजय राऊतांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला.

### गुजरातला सोन्यानं मढवून टाका

**» महाराष्ट्राचा स्वाभिमान आणि अस्मिता सरकारनं दिल्लीच्या वाटेवर पायपुसण्यासारखी टाकून ठेवली आहे. पाय पुसायचा आणि पुढे जायचं आज महाराष्ट्र आणि शेतकरी लुटला जात आहे. महाराष्ट्र आणि मुंबईनं देशाचे पोट भरायचा. पण, महाराष्ट्रात येणारा प्रत्येक उद्योग गुजरातला पळवला जातोय. मराठी माणसाच्या भाग्याचं आणि कष्टाचं एकाच राज्यात जातोय. त्यापेक्षा गुजरातला एकदाच सोन्यानं मढवून टाका, अशी टीका संजय राऊतांनी भाजपावर केली आहे. संजय राऊत म्हणाले, मी एक वक्तव्य ऐकलं, 'काहीही झाले तरी मी तुम्हाला पाडणारच' पण, आमच्या पाडा पाडीच्या खेळात पडला, तर पहिले तुम्ही पडाल नाव घेऊन बोलायचं असतं, आमच्यात दम आहे. 'हवा बोहोत तेज चल रही है, अजितराव टोपी उड जायेगी.'**

# महाविकास आघाडीचा पहिला उमेदवार ठरला

## संजोग वाघेरे यांना ठाकरे गटाकडून मावळची उमेदवारी

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा पहिला उमेदवार ठरला आहे. ठाकरे गटात प्रवेश केलेले माजी महापौर, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे यांची मावळमधील उमेदवारी निश्चित झाली. महायुतीत मतदारसंघ शिवसेनेला सुटला असल्याने मावळमध्ये दोन्ही शिवसेनेत आणि पिंपरी-चिंचवडमधील उमेदवारांमध्ये लढत होण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक आणि पवार कुटुंबीयांशी निष्ठावंत अशी ओळख असलेले संजोग वाघेरे यांनी शनिवारी शिवबंधन बांधत ठाकरे गटात प्रवेश केला. पिंपरी विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव असल्याने वाघेरे यांची लोकसभा निवडणूक लढविण्याची इच्छा आहे. त्यांनी २०१४ आणि २०१९ मध्येही तयारी केली पण,



त्यांना संधी मिळाली नाही. २०१४ मध्ये राहुल नार्वे कर आणि २०१९ मध्ये पार्थ पवार यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळाल्याने वाघेरे यांना माघार घ्यावी लागली होती. शिवसेनेतील फुटीनंतर ठाकरे गटाला मावळमधून सक्षम उमेदवार पाहिजे होता, हीच संधी साधत वाघेरे यांनी ठाकरे गटात प्रवेश केला. उमेदवारीच्या अटीवरच वाघेरे यांचा प्रवेश झाला. अद्याप निवडणूक जाहीर झाली नाही. त्यामुळे एकट्याचे नाव जाहीर करणार नाही पण उत्साह बघून तुम्ही समजू शकता असे सांगत ठाकरे यांनी वाघेरे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केल्याचे स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे महाविकास आघाडीकडून उमेदवार निश्चित झाल्यानंतर आता महायुतीकडून शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना उमेदवारी मिळणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. वाघेरे यांचे शरद पवार यांच्याशी कौटुंबिक संबंध आहेत. त्यामुळे पवार गटाचे कार्यकर्ते वाघेरे यांचे काम पूर्ण ताकदीने करतील. महायुतीत मतदारसंघ शिवसेनेला सुटला असून खासदार बारणे यांना पुन्हा उमेदवारी मिळाल्यास मावळमध्ये दोन्ही शिवसेनेत आणि पिंपरी-चिंचवडमधील उमेदवारांमध्ये लढत होण्याची शक्यता आहे.

# ‘ससून’मधील घोळ संपेना!

## सहा महिन्यांत चौथा अधीक्षक नेमण्याची वेळ

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ससून सर्वोपचार रुग्णालयात सध्या वैद्यकीय अधीक्षक पदाची ‘संगीत खुर्ची’ सुरू आहे. विद्यमान अधीक्षक डॉ.किरणकुमार जाधव यांना हटवून आता त्यांच्या जागी डॉ.अजय तावरे यांची तडकाफडकी नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे सहा महिन्यांत चौथा अधीक्षक नेमण्याचा विक्रम रुग्णालय प्रशासनाने केला. विशेष म्हणजे अधिष्ठातापदाचा कार्यभार डॉ.विनायक काळे यांनी स्वीकारल्यानंतर महिनाभरातच त्यांनी अधीक्षक बदलण्याचे पाऊल उचलले आहे. ससूनच्या वैद्यकीय अध्यक्षपदी मे महिन्यात डॉ. यल्लपा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर ऑगस्टमध्ये




त्यांना हटवून डॉ. सुनील भामरे यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर डॉ. भामरे यांच्याजागी सप्टेंबरमध्ये प्रमुख डॉ.किरणकुमार जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. जाधव यांनी रुग्णालयाच्या प्रशासनातील गोंधळ दूर करीत सुसूत्रता आणली होती. याचबरोबर त्यांनी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांसाठी वक्तशीरपणा आणि शिस्तीचे पाऊल उचलले होते. याबद्दलही अनेक जण त्यांच्यावर नाराज होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. डॉ.अजय तावरे हे आधी अधीक्षकपदी होते. मूत्रपिंड प्रत्यारोपण फसवणूक प्रकरणी तावरे यांची मागील वर्षी एप्रिलमध्ये या पदावरून उचलबांगडी करण्यात आली होती. त्यांची या प्रकरणी विभागीय चौकशीही करण्यात आली होती. याचबरोबर डॉ. तावरे हे न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख आहेत. त्यांच्याकडे एक पूर्णवेळ जबाबदारी असताना वैद्यकीय अधीक्षकपदाची जबाबदारी आता देण्यात आली आहे. एकाच व्यक्तीकडे दोन पूर्णवेळ जबाबदाऱ्या सोपविणे चुकीचे आहे, असेही सूत्रांनी सांगितले.ससून सर्वोपचार रुग्णालयात सध्या वैद्यकीय अधीक्षक पदाची ‘संगीत खुर्ची’ सुरू आहे. विद्यमान अधीक्षक डॉ.किरणकुमार जाधव यांना हटवून आता त्यांच्या जागी डॉ.अजय तावरे यांची तडकाफडकी नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे सहा महिन्यांत चौथा अधीक्षक नेमण्याचा विक्रम रुग्णालय प्रशासनाने केला. विशेष म्हणजे अधिष्ठातापदाचा कार्यभार डॉ.विनायक काळे यांनी स्वीकारल्यानंतर महिनाभरातच त्यांनी अधीक्षक बदलण्याचे पाऊल उचलले आहे. वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ.तावरे यांची नियुक्ती करण्याचा आदेश अधिष्ठाता डॉ.काळे यांनी शुक्रवारी (ता.२९) काढला. मात्र, डॉ. तावरे यांनी या पदाचा कार्यभार त्याआधीच गुरुवारी (ता.२८) रात्री उशिरा स्वीकारला. विशेष म्हणजे डॉ. जाधव यांच्या अनुपस्थितीत त्यांनी हा पदभार स्वीकारला, अशी चर्चा ससूनमध्ये रंगली आहे.

### सहा महिन्यांत चौथा अधीक्षक

» सहा महिन्यांत चौथा अधीक्षक नेमण्याचा विक्रम रुग्णालय प्रशासनाने केला. विशेष म्हणजे अधिष्ठातापदाचा कार्यभार डॉ.विनायक काळे यांनी स्वीकारल्यानंतर महिनाभरातच त्यांनी अधीक्षक बदलण्याचे पाऊल उचलले आहे. ससूनच्या वैद्यकीय अध्यक्षपदी मे महिन्यात डॉ. यल्लपा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. सुनील भामरे यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानंतर डॉ. भामरे यांच्याजागी सप्टेंबरमध्ये प्रमुख डॉ.किरणकुमार जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.

# प्राध्यापक भरती उमेदवारांसाठी आनंदाची बातमी

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात १११ जागांवर प्राध्यापक भरती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** बरीच वर्षे प्रतीक्षा केल्यानंतर अखेरीस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या रिक्त जागांवर आता भरती प्रक्रिया होणार आहे. विद्यापीठातील रिक्त जागांपैकी १११ जागांवर पूर्णवेळ प्राध्यापकांची भरती होणार असून, त्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया रविवार (१ जानेवारी) ऑनलाइन पद्धतीने सुरू होणार आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यात विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना पूर्णवेळ प्राध्यापक मिळणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात रिक्त असलेल्या २१५ पैकी १११ रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यानुसार ही पदे भरण्यासाठी आवश्यक असणारी जाहिरात पुणे विद्यापीठाकडून शनिवारी प्रकाशित करण्यात आली आहे. प्राध्यापकांच्या जागांसह विद्यापीठाच्या



प्रशासनामध्येही काही पदे भरण्यात येणार आहे. त्याबाबतची कार्यवाही करण्यात आली असून, त्या पदांच्या जाहिरातीही लवकरच प्रसिद्ध केल्या जातील, असे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. विद्यापीठात बऱ्याच काळात प्राध्यापक भरती न झाल्याने, विविध शैक्षणिक विभागांमध्ये निम्म्यापेक्षा अधिक प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. काही विभागांमध्ये तर, केवळ एक किंवा दोन पूर्णवेळ प्राध्यापक कार्यरत आहेत. त्यामुळे विद्यापीठात पूर्णवेळ अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या खूपच कमी झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता खालावण्यासह विद्यापीठाच्या क्रमावारीवरही परिणाम झाला आहे. मंजूर पदांपैकी रिक्त जागांवर भरती होत नसल्याने विद्यापीठाला कंत्राटी तत्वावर १३३ प्राध्यापकांची भरती प्रक्रिया राबवावी लागत आहे. मात्र आता १११ पदांची भरती होणार असल्याने विद्यापीठाला दिलासा मिळणार आहे. विद्यापीठातील रिक्त जागांसाठी उमेदवारांना ३१ जानेवारीपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहे, असे सांगण्यात आले आहे. अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.येत्या दोन महिन्यात विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना पूर्णवेळ प्राध्यापक मिळणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात रिक्त असलेल्या २१५ पैकी १११ रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी दिली आहे.